॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ६ ( ) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागातर्फे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कढोली, ता. एरंडोल, जि. जळगाव या ठिकाणी शिक्षक दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात एम.एड. विद्यार्थ्यांनी शालेय विद्यार्थ्यांसाठी समूहगायन, कविता वाचन, कथाकथन, शिक्षणाचे महत्व, स्वच्छतेचे महत्त्व आणि शैक्षणिक खेळाचे आयोजन केले होते. यावेळी कढोली शाळेच्या आदर्श शिक्षक पूरस्कार प्राप्त अलका पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षणशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ.मनीषा इंदाणी यांनी केले. जयश्री शिगाडे या विद्यार्थीनीने डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जीवनपट विद्यार्थ्यांना सांगितला. यावेळी अलका पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. जयसिंग पराडके या विद्यार्थ्यांने स्वच्छतेचे महत्व सांगितले. तर शिल्पा उबाळे आणि शादमा शेख यांनी कथेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना बोध करून दिला. प्यारसिंग पावरा यांनी विद्यार्थ्यांना गुरुचे स्थान कसे आहे याबदल माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुरलीधर झालटे आणि ज्ञानेश्वर पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन करिता डॉ. मनिषा इंदाणी, डॉ. संतोष खिराडे, प्रा. सीमा बारी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रम प्रसंगी कढोली गावच्या संरपंच मंगलाबाई तायडे उपसंरपंच यमुनाबाई बडगुजर, आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शरद बडगुजर , केंद्र प्रमुख विजयसिंग पाटील तसचे शाळेचे मुख्याध्यापक अजयसिंग पाटील तसेच शिक्षक संगीता देशमुख, वैशाली वाल्हे,नंदकुमार अत्रे, अलका पाटील, स्वप्नील पाटील,कैलास पाटील उपस्थित होते.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 6 सप्टेंबर, 2018

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी